दैनिक
साहस वार्ता
संपादक : श्री. श्रीकांत शिवनाथ मुळे
ऑफीस : ३११/अ, एन.एच.४, वाळे, सातारा - 415002 8409494949 sahasnews@gmail.com esahas.com
सातारा | वर्ष -१० वे | | अंक-५५ | मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ | किंमत- २ रु | | पृष्ठे - ४ | RNI No. MAHMUL/2015/67123

द.ग.तटकरे महाविद्यालय तळा येथे रिसर्च कोर्स वर्कचे यशस्वी आयोजन

साहस वार्ता

तळे (पुरुषोत्तम मुळे) : द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा राज्यशास्त्र संशोधन केंद्राच्या माध्यमातून पीएच.डी कोर्स वर्क चे आयोजन दिनांक ५ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. हा रिसर्च कोर्स वर्क पीएच.डी पदवी साठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना करणे अनिवार्य असते. या कोर्स वर्कच्या माध्यमातून संशोधनातील वेगवेगळ्या पैलूंचा, त्या दृष्टीने असणाऱ्या पद्धतींचा, संशोधनाची शिस्त बाळगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचा व संशोधन करत असताना वापरण्यात येणाऱ्या विविध तंत्रांचा कसा वापर करावा, त्याचा कसा आधार घ्यावा याची इत्यंभूत माहिती देण्यात येत आहे . या कोर्स वर्क चे उद्घाटन ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या चेअरमन प्राचार्य डॉ अमृता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी की नोट स्पीकर म्हणून सीनियर प्राध्यापक डॉ .गायकवाड (पुणे) हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश देशमुख यावेळी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्राचार्य डॉ अमृता देशमुख यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात संशोधक विद्यार्थ्यांनी केवळ कोर्स वर्क प्रमाणपत्रासाठी न करता त्यातून शिकण्यासाठी करावे. ज्याचा उपयोग संशोधक विद्यार्थ्यांना जीवनभर होऊ शकेल. त्या दृष्टीने या संशोधन रिसर्च कोर्स वर्क ला गांभीर्याने घ्यावे असे आवाहन त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात केले. की नोट स्पीकर म्हणून बोलताना डॉ .गायकवाड यांनी रीसर्च कोर्स वर्क च्या माध्यमातून असणाऱ्या अपेक्षा आणि त्याचा पीएच.डी पदवी संपादन करताना संशोधनाच्या क्षेत्रात होणारा उपयोग याची मांडणी केली. अध्यक्षीय भाषणामध्ये श्री मंगेश देशमुख यांनी महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले व विविध महाविद्यालयातून व देशभरातून आलेल्या व रिसर्च कोर्स साठी मिळालेल्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल धन्यवाद ही व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिसर्च सेंटरचे डायरेक्टर डॉ भगवान लोखंडे यांनी केले प्रस्ताविकाच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. राज्यशास्त्र विभागाच्या माध्यमातून पदव्युत्तर शिक्षणाचे संघी व अ रिसर्च सेंटर ची सोय ही मुंबई विद्यापीठात कोकण विभागात केवळ आपल्याच महाविद्यालयात असल्याचे ही स्पष्ट केले. या कोर्स वर्क चे प्रमुख डॉ संदीप घोडके यांनी प्रमुख अतिथी चा उपस्थितांना करुन दिला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव यांनी रिसर्च कोर्स वर्कचे औचित्य आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे निवेदन डॉ.तृप्ती थोरात यांनी तर आभार डॉ. कुंटेवाड यांनी मानले. यावेळी संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कोर्स वर्कचे दोन भाग असून पहिला कोर्स हा दोन क्रेडिटचा रिसर्च अँड एथिक्स असा आहे तर दुसरा कोर्स वर्क रिसर्च मेथोडोलॉजीचा चार क्रेडिटचा आहे. पहिला रिसर्च अँड एथिक्स हा कोर्स ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या पाच दिवसाच्या कालावधीत संपन्न झाला. एकूण ३० तासांचा हा कोर्स वर्क दर दिवसाला सहा तास याप्रमाणे पूर्ण करण्यात आला. तर रिसर्च मेथोडोलॉजी चा चार क्रेडिटचा कोर्स हा ११ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या दरम्यान आयोजित केलेला असून यामध्ये दर दिवसाला चार तास याप्रमाणे पंधरा दिवसात एकूण ६० तासांचा हा चार क्रेडिटचा कोर्स आयोजित करण्यात आलेला आहे. २६ फेब्रुवारी रोजी या रिसर्च कोर्स वर्क चा सांगता समारंभ व २८ फेब्रुवारी रोजी दोन्ही रिसर्च कोर्सची अंतिम परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानंतर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल. या रिसर्च कोर्समध्ये देशभरातील ९ विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांसह ११० पेक्षा प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून या सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी देशातील ८ विद्यापीठातील रिसर्च च्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वेगवेगळ्या मान्यवरांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे. या रिसर्च कोर्स वर्क साठी देशभरातील ८ विद्यापीठातील एकूण ६३ रिसोर्स प निमंत्रित करण्यात आलेले असून हा कोर्स ६ पूर्ण केल्यानंतर पीएच.डी करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणी जाणवणार नाहीत. त्यांना त्यांचे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी या रिसर्च कोर्सचा पुरेपूर लाभ होईल याची काळजी घेण्यात आली आहे.संशोधक विद्यार्थी प्रवीण साळुंखे, या रिसर्च कोर्सचे कन्व्हीनर म्हणून वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे व द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय राज्यशास्त्र रिसर्च सेंटरचे संशोधन मार्गदर्शक डॉ संदीप घोडके, रिसर्च सेंटरचे डायरेक्टर डॉ भगवान लोखंडे, आयक्यूसी कॉर्डिनेटर डॉ. तृप्ती थोरात, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव यांनी मेहनत घेतली आहे.संस्थेचे विश्वस्त श्री नंदकुमार वेदक, श्री मारुती शिर्के, श्री. विठ्ठल जोशी, संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश देशमुख, उपाध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन श्री पुरुषोत्तम मुळे, संस्थेचे सचिव श्री महेंद्र कजबजे, संस्थेचे खजिनदार श्री चंद्रकांत रोडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी ,महाविद्यालय विकास समितीचे सदस्य या सर्वांनी या रिसर्च कोर्सच्या यशस्वी आयोजनाबद्दल रिसर्च सेंटरचे मनापासून कौतुक केले.

द. ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील यूजीसी शॉर्ट टर्म कोर्स चे आयोजन

तळे, (पुरुषोत्तम मुळे) – तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे अंतरान [illegible] हमी कक्ष व राज्यशास्त्र विभागा च्या वतीने यूजीसी एमएमटीटीसी [illegible] राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांच्या संयुक्त [illegible] करारा अंतर्गत १५ दिवसीय शॉर्ट टर्म कोर्सचे आयोजन [illegible] मार्च [illegible] ते १५ मार्च २०२६ या कालावधीत ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूरच्या मार्फत आतापर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ४५ शॉर्ट टर्म कोर्सचे यशस्वी आयोजन करण्यात आले असून ४६ वा शॉर्ट टर्म कोर्स आयोजित करण्याची संधी द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयास प्राप्त झाली आहे.

या कोर्समध्ये देशभरातील विविध विद्यापीठांमध्ये कार्यरत प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार असून आतापर्यंत १०० पेक्षा अधिक प्राध्यापक व संशोधकांनी या शॉर्ट टर्म कोर्स साठी नाव नोंदणी केलेली आहे. डॉ.सी.जी.देठे, डायरेक्टर यूजीसी, एम एम टी टी सी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर डॉ प्रिती धर्मिक कोऑर्डिनेटर यांच्या मार्गदर्शनाखाली या कोर्स वर्कचे आयोजन करण्यात आले असून डॉ तृप्ती थोरात डॉ.भगवान लोखंडे, डॉ संदीप घोडके हे महाविद्यालय स्तरावर या कोर्स वर्कच्या आयोजनात समन्वयक म्हणून भूमिका बजावणार आहेत.

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री. नंदकुमार वेदक, श्री. मारुती शिर्के, श्री. विठ्ठल जोशी, संस्थेचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन श्री पुरुषोत्तम मुळे, संस्थेचे सचिव श्री. महेंद्र कजबजे, संस्थेचे खजिनदार श्री. चंद्रकांत रोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नानासाहेब यादव, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांनी या कोर्स वर्क साठी शुभेच्छा देऊन या उपक्रमाचे कौतुक केले आहे. या कोर्स वर्क साठी कोणतेही शुल्क आकारण्यात आलेले नसून या कोर्स वर्क चा लाभ महाविद्यालयीन प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी अधिकाधिक घ्यावा असे आवाहनही